IO प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0730 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/09/2025 21:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/09/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/09/2025

**Time From (वेळेपासून):** 15:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/09/2025 **Time (वेळ):** 21:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/09/2025 21:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तापडीया ईस्टेट ,संजीवनी हॉस्पीटल समोर हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रमोद दामोधर भोरगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केसापुर,हिंगोली ,नर्सी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केसापुर,हिंगोली ,नर्सी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7559209207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोविंद संभाजी दहिफळे | | | 1. चिखली ,अहमदपुर ,किनगांव, लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद                    दिनांक:- 23.09.2025

मी प्रमोद दामोधर भोरगे, वय 29 वर्ष,व्यवसाय रोजमुजरी, रा.केसापुर,ता.जि.हिंगोली. मो. 7559209207

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे फिर्याद देतो की, मी दिनांक 22.09.2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, यांचेकडे पंचासमक्ष तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी व मुलगा आणि दोन भाउ यांचेसह राहतो. मी रोजमजुरी करतो. माझी आई नामे पंचशिला दामोधर भोरगे हि बांधकाम मजुर म्हणुन काम करत होती. त्यामुळे तीची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली या कार्यालयात बांधकाम मजुर म्हणुन नोंदणी केलेली होती. माझी आई दिनांक 07.07.2022 रोजी मरण पावली आहे. तसेच माझे चुलत मामा नामे किसन केरबा कांबळे रा. केसापुर हे देखील मजुरीचे काम करत असल्यामुळे त्यांची देखील सदर कार्यालयात बांधकाम मजुर म्हणुन नोंदणी आहे. मामा किसन कांबळे हे देखील दिनांक 05.03.2025 मध्ये मरण पावले आहेत.

बांधकाम मजुर मृत्यू पावल्याचे नंतर त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, या कार्यालयाकडुन विमा (क्लेम) मंजुर होतो. सदर विमा (क्लेम) मिळण्यासाठी मी माझे आईचा 24,000/- रू चा क्लेम दिनांक 05.05.2025 रोजी व मामा केरबा कांबळे यांचा 2,34,000/- रू चा क्लेम एप्रील 2025 मध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कार्यालय, तापडीया इस्टेट, हिंगोली येथ दाखल केलेला आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली या कार्यालयातील श्री दहीफळे साहेब यांना मी वेळोवळी जावुन माझे आईचा व मामाचा त्यांचे कार्यालयात दाखल केलेल्या क्लेमच्या प्रकरणाबाबत चौकशी केली. परंतु अद्यापपावेतो माझ्या आईचा व माझे चुलत मामाचा क्लेमचा लाभ मिळालेला नाही. मी आज दिनांक 22.09.2025 रोजी माझी आई व चुलत मामाच्या क्लेमच्या संदर्भात श्री दहिफळे साहेबांना भेटलो, तेव्हा श्री दहिफळे साहेब मला म्हणाले की, '' साहेब माझ्या ओळखीचे आहेत साहेबांना सांगुन तुझ काम करून देतो त्यासाठी मला 50,000/ रू लागतात तु मला दे मी तुझे काम करून देतो '' असे म्हणुन माझ्याकडे पैशाची मागणी करीत आहेत. त्यांना पैसे देण्याची माझी इच्छा नाही. त्यांचेशी माझी कोणतीही वैयक्तिक दुष्मनी किंवा देण्याघेण्याचा आर्थीक व्यवहार नाही. माझे आईचा व चुलत मामाचा क्लेम मंजुर करण्यासाठी मी दहिफळे साहेबांना पैसे दिले नाही तर मला क्लेमचा लाभ मिळणार नाही. मी दहिफळे साहेबांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात जाणार आहे. तरी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कार्यालयातील श्री दहिफळे साहेब यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे. अशी तक्रार दिली होती. त्यांनतर श्री विकास घनवट पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि हिंगोली यांनी शासकिय कार्यालयातुन दोन पंच नामे श्री अजय मधुकर कुलकर्णी, व्यवसाय नौकरी, लेखापाल, विभागीय वन अधिकारी कार्यालय, हिंगोली व श्री बलखंडी जनार्धन ढगे, व्यवसाय नौकरी, लिपिक, विभागीय वन अधिकारी कार्यालय, हिंगोली यांना बोलावुन घेवून त्यांना माझा व मला त्यांचा परीचय करून दिला. मी दिलेली तक्रार पंचानी वाचुन त्यावर पंचानी सहया केल्या.

दिनांक 22.09.2025 रोजी करण्यात आलेल्या तक्रार पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र.1 श्री अजय मधुकर कुलकर्णी, यांचेसह माझे मोटर सायकल क्रमांक एम.एच.38 एन 2536 ने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली कार्यालयातील श्री दहिफळे साहेब, यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेलो. तेथे दहिफळे साहेब यांची भेट झाली तेव्हा मी त्यांना प्लीज आपलं काम करानं तेवढं... दोन क्लेमाचे...दोन्ही क्लेमाचे...एक चोवीस हाजाराची हयेना व एक दोन लाख चवतीस हाजाराची....तेव्हा दहिफळे साहेब मला म्हणाले की, पन्नास हजार देवुन टाक दोन्हीचे... तेव्हा मी त्यांना चाळीस मधी राहु द्या दहा आता देतो



Scanned with OKEN Scanner

तेव्हा ते मला म्हणाले की, आयकत जाय काही गोष्टी...तेव्हा मी त्यांना म्हणालो की, मग किती करू तेव्हा दहिफळे साहेब हे मला म्हणाले की, दहा दे बाकीचे मग......झाल्यावर...दे. तेव्हा मी त्यांना म्हणालो आता दहा.... पडल्यार किती. तेव्हा त्यांनी मला हाताने इशारा करून चाळीस असे म्हणुन होकार दर्शवुन उद्या येण्यास सांगुन माझेकडुन लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दर्शविली.

त्यानंतर आज दिनांक 23.09.2025 रोजी मी, पंच क्र.1 श्री अजय मधुकर कुलकर्णी, यांचेसह माझे मोटर सायकल क्रमांक एम.एच.38 एन 2536 ने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली कार्यालयातील श्री दहिफळे साहेब, यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेलो. तेथे त्यांची व माझी भेट झाली तेव्हा दहिफळे साहेब हे मला म्हणाले की, आला का तेव्हा मी त्यांना म्हणालो हो आलो नंतर ते मला म्हणाले दहा... तेव्हा मी त्यांना म्हणालो आणले. तेव्हा दहिफळे साहेब मला म्हणाले की चल बाहेर, जावु बाहेर असे म्हणुन कार्यालयाचे बाहेर आले. त्यांनी त्यांची स्कुटी घेवुन मला त्यांचे पाठीमागे बोलावल्याने मी माझी मोटर सायकल घेवु त्यांचे पाठीमागे गेलो. तेव्हा संजिवनी बाल रूग्णालय तापडीया इस्टेट, हिंगोली चे समोर त्यांची स्कुटी थांबवुन मला थांबण्याचा इशारा केला. तेव्हा मी देखील तेथे थांबलो. आम्ही दोघेही गाडीचे खाली उतरलो मी दहिफळे साहेब यांन माझे काम होईल का असे विचारले असता त्यांनी त्यांचा उजवा हात पैसे घेण्यासाठी समोर केला. तेव्हा मी त्यांना माझे पॅटचे उजवे खिशातील 10,000/- रू बाहेर काढुन त्यांचे हातात दिले. तेव्हा त्यांनी रक्कम हातात पकडुन मी दिलेली रक्कम दहा हयेत नं असे मला विचारले. त्यावर मोजा पुन्हा मला विचारसाल असे म्हणालो. त्यावर मी त्यां आता राहीलेले केव्हा देवु असे विचारले असता दहिफळे साहेब हे मला म्हणाले की, पैसे पडल्यास दे बस तेव्हा त्यांनी मी दिलेले 10,000/- रू मोजुन त्यांचे खिशात ठेवत असतांना दहिफळे साहेब यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले आहे.

लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे, दहिफळे साहेब यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी गोविंद संभाजी दहिफळे, वय 37 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद- इन्चार्ज डेटा एंन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी कर्मचारी), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली रा. चिखली, ता.अमदपुर, जि. लातुर, ह.मु. झंवर यांचे घरी किरायाने सरस्वती नगर, हिंगोली यांनी त्याचे पदाचा दुरूपयोग करून त्यांना मिळणारे पारिश्रमिका खेरीज '' साहेब माझ्या ओळखीचे आहेत साहेबांना सांगुन तुझ काम करून देतो त्यासाठी मला 50,000/ रू लागतात तु मला दे मी तुझे काम करून देतो '' असे म्हणुन लाच मागणी पडताळणी दरम्यान तडजोडी अंती 10,000/- रू आज व काम झाल्यावर 40,000/- रू लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दर्शवुन माझेकडुन लाचेची 10,000/- रू रक्कम स्वतः 13.26 वा.चे सुमारास संजीवनी बाल रूग्णालयाचे समोर रोडवर, तपाडीया इस्टेट हिंगोली येथे स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 23.09.2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री विकास घनवट यांना तोंडी सांगितली असून ती संगणकावर टंकलिखित केली. माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(विकास घनवट)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

सही -
प्रमोद दामोधर भोरगे



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.): DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.हिंगोली (श.)

FIR चि १ प्रत विनामुल्य मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDEEP KHANDER.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with OKEN Scanner